| MHJN010007262025 | दाखल दिनांक -०७.०३.२०२५<br>नोंदणी दिनांक -१३.०३.२०२५<br>निकाल दिनांक - २५.०८.२०२६<br>कालावधी -०१ वर्ष ०५ महिने १८ दिवस |
|---|---|

सत्र न्यायाधीश, जालना यांचे न्यायालयात.
(पिठासीन अधिकारी :- जिल्हा न्यायाधीश-८ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश)

सत्र खटला क्र. ४५/२०२५ नि.क्र. ६१
(प्रथम खबर अहवाल क्र. १५/२०२३)
(प्रथम खबर अहवाल दिनांक १४/०१/२०२३)
(अपराध कलम – ३२८, १८८, २७३ सहकलम ३४ भा.दं.वि. तसेच अन्न सुरक्षा व मानके कायदा सन २००६ चे कलम ५९ अन्वये)

महाराष्ट्र शासन
तर्फे पोलीस निरीक्षक
कदीम जालना पोलीस ठाणे, ... अभियोगपक्ष

- विरुध्द -

१) गयास मोइनोद्दीन पठाण,
वय ३४ वर्षे,
रा. इंदीरानगर, जालना, ता.जि. जालना

२) अतुल लक्ष्मीनारायण चौंडीये,
वय २१ वर्षे,
रा. शोला चौक, जालना, ता.जि. जालना ...आरोपी

---

श्री. ए.डी.मते, सहा. सरकारी अभियोक्ता.
श्री. आय.बी.पठाण, आरोपी क्र. १ चे विधिज्ञ
श्री. शेख शारेख, आरोपी क्र. २ चे विधिज्ञ

---

| | | |
|---|---|---|
| अपराध दिनांक | | १३/०१/२०२३ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | | १४/०१/२०२३ |
| दोषारोप दाखल दिनांक | | १९/०६/२०२३ |
| दोषारोप ठेवल्याची दिनांक | | ०६/११/२०२५ |

| | | |
|---|---|---|
| पुरावा आरंभ झाल्याची दिनांक | | ०९/०२/२०२६ |
| न्यायनिर्णयाची राखीव दिनांक | | निरंक |
| न्यायनिर्णय दिनांक | | २५/०८/२०२६ |
| शिक्षा लादलेली असल्यास दिनांक | | निरंक |

| क्र. | आरोपींचे नाव | अटक दिनांक | जामीन दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष किंवा दोषी | लादलेली शिक्षा | कलम ४२८ फौ.प्र.सं. नूसार कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | गयास मोइनोद्दीन पठाण | १४/०१/ २०२३ | १७/०१/२०२३ | कलम ३२८, १८८, २७३, सहकलम ३४ भा.दं.वि. तसेच अन्न सुरक्षा व मानके कायद्याचे कलम ५९ अन्वये | निर्दोष | निरंक | निरंक |
| २. | अतुल लक्ष्मीनारायण चौंडीये | २३/०२/ २०२३ | २४/०२/ २०२३ | | निर्दोष | निरंक | निरंक |

अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी -

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार | नि.क्र. |
|---|---|---|---|
| सा.-१ | प्रशांत सुरेश अजिंठेकर | फिर्यादी | ४१ |
| सा.-२ | प्रल्हाद रामभाउ मोताळे | पंच साक्षीदार | ४३ |
| सा.-३ | सय्यद आमेर सय्यद अख्तर | पंच साक्षीदार | ४६ |
| सा.-४ | रामेश्वर त्रिंबक राऊत | साक्षीदार | ५४ |
| सा.-५ | ज्ञानदेव आनंदराव नागरे | तपासी अंमलदार | ५७ |

ब. आरोपींच्या साक्षीदारांची यादी - निरंक
क. न्यायालयीन साक्षीदार - निरंक
निशाणी क्रमांकाची यादी -
अ. अभियोगपक्ष -

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | पी-१/पीडब्ल्यू-१ | नमुना पंचनामा |
| २. | पी-२/पीडब्ल्यू-१ | फिर्याद |
| ३. | पी-३/पीडब्ल्यू-१ | प्रथम खबर अहवाल |
| ४. | पी-४/पीडब्ल्यू-१ | अन्न विश्लेषक यांना पाठविलेले पत्र |
| ५. | पी-५/पीडब्ल्यू-१ | अन्न विश्लेषक यांचा अहवाल |
| ६. | पी-१/पीडब्ल्यू-२ | घटनास्थळ पंचनामा |
| ७. | पी-१/पीडब्ल्यू-३ | जप्ती पंचनाम्यावरील साक्षीदाराची सही |

| | | |
|---|---|---|
| ८. | पी-१/पीडब्ल्यू-५ | जप्ती पंचनामा |
| ९. | पी-२/पीडब्ल्यू-५ | अन्न विश्लेषक यांना पाठविलेले पत्र |

ब. बचावपक्ष - निरंक

क. न्यायालयीन निशाणी -

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | २८ | दोषारोपपत्र |
| २. | २९ व ३० | आरोपींचे निवेदन |
| ३. | ६० | फौ.प्र.सं. कलम ३१३ अन्वये आरोपी क्र. १ चे निवेदन |

ड. मुद्देमाल -

| अ.क्र. | मुद्देमाल पावती क्र. | तपशिल |
|---|---|---|
| १ | मु.क्र. ०६/२०२३ | राज निवास पान जर्दा ३५ पुडे किंमत ७,०००/- |
| २. | | आर.एम.डी. पान मसाला १ पुडा किंमत ४८०/- |
| ३. | | विमल पान मसाला ५ पुडे किंमत १०००/- |
| ४. | | सिग्रेचर पान मसाला १ पुडा किंमत २५०/- |
| ५. | | गोवा १००० गुटखा पर्पल १९ पुडे किंमत २८५०/- |
| ६. | | गोवा १००० गुटखा लाल १२ पुडे किंमत ३३८६/- |
| ७. | | होंडा शाईन मोटार सायकल नो.क्र. एम.एच.२१ बी.डब्ल्यु. ४३३४ |

## न्यायनिर्णय

(पारीत दिनांक २५ ऑगस्ट, २०२६)

आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३२८, १८८, २७३, सहकलम ३४ अन्वये तसेच अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ चे कलम ५९ अन्वये खटला दाखल करण्यात आलेला आहे.

### थोडक्यात अभियोगपक्षाचे कथन असे आहे की: -

२. दि. १३/०१/२०२३ रोजी कदीम जालना पो.स्टे. येथील पोलीस उपनिरीक्षक डी.ए.नागरे हे सकाळी १०.३० वाजता पोलीस स्टेशन हद्दीत इंदीरानगर

येथे तपासासाठी गेले असता तेथे एक इसम नामे गयास मोईनोद्दीन पठाण हा होंडा शाईन मोटार सायकल क्र. एम.एच.२१ बी.डब्ल्यु. ४३३४ वर पोतडया मध्ये बांधून प्रतिबंधीत पान मसाला, सुगंधी तंबाकू घेवून जाताना आढळून आला. सदर वाहन मुद्देमालासह त्यांनी ताब्यात घेवून जप्ती पंचनामा केला व पोलीस स्टेशन येथे आणले. त्यांनी सदर घटनेबाबतची माहिती अन्न सुरक्षा अधिकारी प्रशांत सुरेश अजिंठेकर यांना दिली. त्यावरुन ते दि. १४/०१/२०२३ रोजी ११.०० वाजता कदीम जालना पोलीस स्टेशन येथे गेले. तिथे श्री. नागरे यांनी त्यांना गाडी, मुद्देमाल व जप्ती पंचनामा दाखवला. त्यांनी मुद्देमालाची तपासणी केली असता त्यांना राजनिवास पान मसाला ३५ पाकीटे, आर.एम.डी. पान मसाला १ पाकीट, विमल पान मसाला ५ पाकीट, सिग्नेचर पान मसाला १ पाकीट, गोवा १००० गुटखा पर्पल १९ पाकीट,गोवा गुटखा १००० गुटखा लाल १२ पाकीट असा एकूण प्रतिबंधीत मुद्देमाल १५,३००/- व होंडा शाईन मोटर सायकल नो.क्र. एम.एच.२१बी.व्ही.४३३४ किंमत ८०,०००/- दिसून आला. त्यांनी मुद्देमालाची तपासणी केली असता सदर अन्न पदार्थामध्ये सुपारी व तंबाखू प्रमुख घटक असून त्यावर प्रक्रिया करुन त्यात कृत्रिम स्वाद व सुगंध घालून उक्त पदार्थ तयार करण्यात आल्याचे दिसून आले. त्यामुळे त्यांनी प्रत्येकी एकएक पाकीट तपासणीकामी काढून घेतले. त्यानंतर फिर्यादी प्रशांत सुरेश अजिंठेकर, अन्न सुरक्षा अधिकारी, जालना यांनी पोलीस ठाणे कदीम जालना येथे दि. १४/०१/२०२३ रोजी आरोपी विरुध्द तक्रार दिली.

३. सदर फिर्यादीवरुन पोलीस ठाणे कदीम जालना येथे गुन्हा क्र. १५/२०२३ दाखल होवून तपासकाम पोलीस उपनिरीक्षक डी.ऐ. नागरे यांचेकडे दिले. त्यांनी दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा तयार केला, मोटार सायकल व प्रतिबंधीत माल जप्त केला. मुद्देमाल सी.ऐ.तपासणीकामी पाठविला. साक्षीदारांचे जाबजवाब नोंदवले. आरोपींना अटक केले. तपासानंतर आरोपींविरुध्द वरील गुन्हयाअन्वये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

४. भारतीय दंड विधान कलम ३२८ अन्वये गुन्हा सत्र न्यायालयात चालविण्यात येत असल्याने, प्रमुख न्यायदंडाधिकारी, जालना यांनी दिनांक १७/०२/२०२५ रोजी नियमित फौजदारी खटला क्रमांक ५०२/२०२३ मध्ये

निशाणी क्रमांक १ खाली आदेश करुन प्रकरण जिल्हा न्यायालयात वर्ग करण्यात आले.

५. आरोपींविरुध्द वरील गुन्ह्यांखाली दोषारोप (नि.क्र.२८) ठेवण्यात आले. त्यातील मजकूर आरोपींना समजेल अशा भाषेत वाचून दाखवला. आरोपींनी गुन्हा नाकारुन संपरिक्षेस सामोरे जाण्याची विनंती केली.

६. अभियोगपक्षातर्फे आरोपींचा गुन्हा सिध्द करण्याकरीता एकूण ५ साक्षीदारांचा तोंडी पुरावा वरील यादीमध्ये नमुद केल्याप्रमाणे व अभियोगपक्षाने पुरावा बंद पुरसिस दाखल केली.

७. फौजदारी प्रकिया संहितेचे कलम ३१३(१)(ब) आरोपी क्र. १चे बयाण (नि.क्र. ६०) नुसार नोंदविले. त्यांनी त्यांच्या विरुध्द खोटी केस केली असल्याचा बचाव घेतला. नि.क्र. १ वरील आदेशानुसार आरोपी क्र. २ चे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ (१)(ब) अन्वये निवेदन वगळण्यात आले.

८. अभियोग पक्षातर्फे अति. सरकारी अभियोक्ता श्री. ए.डी. मते व आरोपींतर्फे विधिज्ञ श्री आय.बी.पठाण यांचा युक्तिवाद ऐकला. खालील मुद्दे उपस्थित झालेले असून त्याचे निष्कर्ष व त्यावरील कारणे खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक १३/०१/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजेच्या सुमारास इंदीरानगर, जालना येथे दोन्ही आरोपींनी आपसात संगनमत करुन प्रतिबंधीत अन्नपदार्थ या सारख्या खाद्यपदार्थांमध्ये भेसळ करुन किंवा दुखापत पोहोचवण्याच्या किंवा गुन्हा करण्याच्या अथवा गुन्हा करण्यास सहाय्य करण्याच्या उद्देशाने सदर पदार्थ सेवन करण्यास भाग पाडले व अशाप्रकारे त्यांनी भादविचे कलम ३२८ सहकलम ३४ नूसार गून्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| २. | वरील तारीख, वेळ व ठिकाणी दोन्ही आरोपींनी संगनमत करुन अन्न सुरक्षा आयुक्त यांनी गुटखा प्रतिबंधीत केल्याच्या आदेशाची जाणीव असतांना देखील प्रतिबंधीत गुटखा विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगला व आयुक्तांच्या आदेशाचा भंग केला व भादविचे कलम १८८ सहकलम ३४ नूसार गून्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले काय? | नाही. |
| ३. | वरील नमुद तारीख, वेळ व ठिकाणी दोन्ही आरोपींनी संगनमत करुन मानवी आरोग्यास हानिकारक भेसळयुक्त गुटखा विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगुन भादविचे कलम २७३ सहकलम ३४ नूसार गून्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नाही. |
| ४. | वरील नमुद तारीख, वेळ व ठिकाणी गुटखा, पान मसाला व सुगंधीत तंबाखु इत्यादी पदार्थ अन्न किंवा पेय विक्री साठी ठेवले किंवा विक्री केले ते खाण्यायोग्य नाही किंवा भेसयुक्त असून हानिकारक आहेत, हे माहिती असून किंवा तसे मानण्यास वाजवी कारण असूनही आरोपी विक्री करण्याकरीता सोबत बाळगले व अशाप्रकारे अन्न सुरक्षा व मानके कायद्याचे कलम ५९ नूसार गून्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नाही. |
| ५. | काय आदेश ? | दोन्ही आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले. |

<u>कारणमिमांसा</u>

<u>मुद्दा क्र.१ ते ४ करिता</u> -

९. मुद्दा क्रमांक १ ते ४ हे एकमेकांशी निगडीत असल्याने एकत्रीत विचारात घेण्यात आले.

१०. सरकारी विधिज्ञांनी युक्तिवाद केला की, आरोपींनी आपसांत संगणमत करुन मानवी आरोग्यास अपायकारक, भेसळयुक्त प्रतिबंधीत गुटखा विक्री करण्याच्या

उद्देशाने बाळगला व आयुक्तांच्या आदेशाचा भंग केला. आरोपींविरुध्द गुन्हयाशी संबंधीत पुरेसा पुरावा उपलब्ध आहे. करिता आरोपींना योग्य ती शिक्षा करण्यात यावी.

११. आरोपींच्या विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, आरोपींविरुध्द गुन्हयाशी संबंधीत ठोस पुरावा उपलब्ध नाही. तपासी अंमलदार यांच्या तपासात अनेक त्रुटी आहेत. अन्न सुरक्षा अधिकारी यांचा सदर कार्यवाहीमध्ये कोणताही सहभाग नव्हता. प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराचा पुरावा नाही. तसेच जप्ती पंचनाम्यातील मजकुर पंच साक्षीदारांच्या पुराव्यात सिध्द झालेला नाही. तरी आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात यावे.

१२. फिर्यादी प्रशांत सुरेश अजिंठेकर (नि.क्र.४१) यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दि. १३/०१/२०२३ रोजी पोलीस उपनिरीक्षक डी.ए.नागरे यांनी एका व्यक्तीकडून गुटखा पान मसाला जप्त केला होता. त्याबाबतचे पुढील कार्यवाही साठी त्यांच्या कार्यालयाला पत्र दिले होते. वरीष्ठांनी दिलेल्या निर्देशानुसार ते दि. १४/०१/२०२३ रोजी कदीम जालना पोलीस स्टेशन येथे गेले. श्री. नागरे यांनी त्यांना मुद्देमाल दाखवला. त्यांनी दोन पंचासमक्ष मुद्देमालाची तपासणी केली असता त्यात राजनिवास, आर.एम.डी., विमल, सिग्नेचर पानमसाला, गोवा गुटखा असा एकूण १५,३००/- चा प्रतिबंधीत मुद्देमाल आढळून आला. त्यांनी प्रत्येकी एकएक पाकीट तपासणीकामी काढून घेतले व तसा पंचासमक्ष पंचनामा तयार केला. अन्न नमुने विष्लेशक, अन्न प्रयोग शाळा छत्रपती संभाजीनगर येथे पत्र नि.क्र. पि.-४/पि.डब्ल्यु-१ अनुसार पाठविले व अन्न विष्लेशकाचा अहवाल नि.क्र. पि-५/पि.डब्ल्यु१ मिळाला. त्यांनी फिर्याद दिली.

१३. फिर्यादीच्या पुराव्याचे अवलोकन करण्यात आले. त्यांच्या उलटतपासात असे आले आहे की, त्यांच्या समक्ष आरोपीकडून कोणतीही जप्ती केली नव्हती व त्यांनी घटनास्थळावर भेट दिली नव्हती. सदर कथनावरून सदर साक्षीदार हा छापा कारवाईच्या वेळी सहभागी नव्हता, असे दिसून येत आहे. पोलीसांकडून त्याांना घटनेबाबत कशी माहिती मिळाली याबाबत कोणताही उहापोह केलेला नाही

अथवा तसे पत्र त्यांना प्राप्त झालेले नाही. फिर्याद एका दिवसाच्या विलंबाने दाखल केलेली आहे, त्याबाबत योग्य ते स्पष्टीकरण दिलेले नाही. तसेच रासायनिक विष्लेशनाकामी घेतलेले नमुने ज्या पंचासमक्ष घेतले, त्या पंच साक्षीदारास तपासण्यात आलेले नाही. तसेच सदर मुद्देमालाचा पाहणी पंचनामा केला असता, जो मुद्देमाल पान मसाला व गुटखा आढळून आला त्यावरील पंच साक्षीदाराचा पुरावा आलेला नाही. फिर्यादीने अन्न सुरक्षा व मानके कायद्याचे कलम ४२ व ४७ चे योग्य ते प्रक्रिया अवलंब केल्याचे दिसत नाही. अशा परिस्थितीत फिर्यादीचा पुरावा सरकार पक्षास फारसा उपयुक्त दिसून येत नाही.

१४. अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. ५ ज्ञानदेव नागरे (नि.क्र.५७) हा कार्यवाहीच्या वेळी हजर असलेला साक्षीदार असून त्यांनी गुन्हयाचा तपास केलेला आहे. त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दि. १३/०१/२०२३ रोजी सकाळी ०१.३० वाजेच्या सुमारास चोरीच्या गुन्हयाचा तपास करीत असतांना इंदीरानगर भागात एक ईसम मोटार सायकलला एक पिशवी अटकविलेला दिसला. त्यांनी त्यास संशयावरून थांबविले असता, त्याचे नाव गयास पठाण होते. पिशवीची तपासणी केली असता त्यामध्ये प्रतिबंधीत गुटखा, पान मसाला, विमल, राजनिवास, वेगवेगळया कंपनीचा गुटखा व पान मसाला होता. त्यांनी तो मुद्देमाल व मोटारसायकल पंचासमक्ष जप्ती पंचनामा नि.क्र. पि.१/पि.डब्ल्यु ५ करुन जप्त केला. दि. १३/०१/२०२३ रोजी अन्न निरीक्षक यांना पत्र दिले.

१५. सदर साक्षीदाराची आरोपीच्या वतीने उलटतपासणी घेण्यात आली. साक्षीदार ज्ञानदेव यांच्या उलटतपासात असे आले आहे की, घटनास्थळ हे वर्दळीचे ठिकाण असून आजुबाजुला लोकांचा वस्ती आहे व येणे जाणे चालू असते. परंतु कोणत्याही स्वतंत्र साक्षीदाराचा बयाण नोंदविलेला नाही अथवा त्यांना प्रकरणात तपासण्यात आलेले नाही. त्यांनी स्पष्टपणे प्रतिपादन केलेले आहे की, आरोपी क्र. १ हा प्रतिबंधीत पदार्थ विक्री करतांना अथवा त्याच्याकडे ग्राहक माल खरेदी करतांना मिळून आलेला नाही. आरोपी याच्या कथीत कृत्यामुळे कोणालाही विषबाधा व दुखापत झाल्याची तक्रार त्यांच्याकडे आली नसल्याचे मान्य केलेले आहे. अशा परिस्थितीत आरोपीकडे सदर भेसळयुक्त व ईजा पोहचविणारा मुद्देमाल होता किंवा

नाही याबाबत संभ्रम निर्माण होत आहे. शिवाय ईतर कोणत्याही स्वतंत्र साक्षीदाराचा पुरावा नोंदविलेला नाही. त्यांच्या पुराव्याप्रमाणे आरोपीकडे मोटार सायकलवर कापडी पिशवीत मुद्देमाल मिळून आला. याउलट फिर्यादीमध्ये पोतडीमध्ये मुद्देमाल मिळून आल्याचे नमुद आहे. त्यामुळे त्याबाबत विसंगती दिसून येत आहे. त्यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, तपासादरम्यान आरोपी क्र. १ गयास याने आरोपी क्र. २ कडून सदर मुद्देमाल खरेदी केल्याबाबत सांगितले होते. परंतु आरोपी क्र. २ विरूध्द प्रकरणात अजिबात कोणताही पुरावा आलेला नाही. तसेच आरोपी क्र. १ याने तपासामध्ये केलेले कथन पुराव्यामध्ये ग्राहय धरता येत नाही. आरोपी क्र. २ विरूध्द गुन्हयाशी संबंधीत पुरावा नसल्यामुळे त्याचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये चे निवेदन वगळलेले आहे. त्याच्या विरूध्द कोणताही पुरावा नाही.

१६. अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. ३ सय्यद आमेर सय्यद अख्तार (नि.क्र. ४६) यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दि. १३/०१/२०२३ रोजी तो पोलीस स्टेशनमध्ये गेला होता, पोलीसांनी त्याच्या कशावर सहया घेतल्या होत्या, हे त्यास माहिती नाही. अभियोग पक्षाच्या वतीने त्यास फितूर घोषीत करून उलटतपास स्वरुपाची सुचक प्रश्ने विचारली. तेव्हा त्याने त्याच्या समक्ष पोलीसांनी राजनिवास, विमल, पानपराग, गोवा गुटखा जप्त केल्याचे स्पष्टपणे नाकारले आहे. त्यामुळे कार्यवाहीच्या दिवशी आरोपी क्र. १ याच्या ताब्यातून सदर मुद्देमाल जप्त केल्याचे सिध्द होत नाही. त्यामुळे तपासीक अंमलदार यांच्या पुराव्यास जप्तीबाबत स्वतंत्र पुष्टीकारक पुरावा नाही. त्यामुळे जप्ती योग्यरित्या सिध्द होत नाही.

१७. अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. २ प्रल्हाद मोताळे यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दि. १८/०१/२०२३ रोजी श्री. नागरे यांनी त्यांच्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा नि.क्र. पि.१/पि.डब्ल्यु२ तयार केला. पंचनाम्याचे अवलोकन केले असता, सदर पंचनामा १२.१५ ते १२.३० वाजेच्या दरम्यान तयार केल्याचे दिसून येत आहे. परंतु सदर साक्षीदाराच्या पुराव्यात असे आले आहे की, ते घटनास्थळावर दुपारी १२.३० वाजता पोहोचले होते व त्यानंतर पंचनामा तयार करण्यात आला. घटनास्थळाच्या चतु:सिमा त्यांना सांगता आल्या नाहीत. तसेच घटनास्थळ पंचनामा हा पाच दिवसांच्या विलंबाने तयार केलेला आहे. विलंबा बाबत

कोणतेही योग्य स्पष्टीकरण आलेले नाही. अशा परिस्थितीत पंचनाम्याबाबत संशय निर्माण होतो.

१८. अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. ४ रामेश्वर राऊत (नि.क्र. ५४) यांच्या पुराव्यात असे आले आहे की, श्री. नागरे यांनी त्यांना व पोलीस कॉन्स्टेबल अन्सारी यांस इंदीरानगर येथे बोलावले होते. त्या ठिकाणी श्री. नागरे हजर होते व एक ईसम शाईन गाडीवर दिसला. त्याच्याकडे सुगंधीत पान मसाला व गुटखा आढळून आला. परंतु फिर्यादी व ईतर साक्षीदारांचा पुरावा आरोपींविरूध्द गुन्हयाशी संबंधीत ठाम व निश्चीत नसल्याने सदर साक्षीदाराचा पुरावा औपचारीक स्वरुपाचा दिसून येत आहे.

१९. उपलब्ध पुराव्यांवरुन सदर कार्यवाही केवळ पोलीसांनी अन्ननिरीक्षक यांच्या सहभागाशिवाय स्वत:हून केलेली असल्याचे दिसून येते. आरोपीच्याच ताब्यात सदर गुटखा मिळून आला, याबाबत ठोस व विश्वसनिय पुरावा नाही. आरोपी क्र. १ याच्याकडून प्रतिबंधीत गुटखा जप्त केल्याचे योग्य रित्या सिध्द झालेले नाही. आरोपी क्र. २ विरुध्द कोणत्याही स्वरुपाचा पुरावा नाही. ईतर कोणत्याही स्वतंत्र साक्षीदाराचा पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. उपलब्ध पुरावा आरोपींविरुध्द गुन्हयाशी संबंधीत उपयुक्त नाही. गुन्हयाचे मुख्य घटक सिध्द झालेले नाहीत. म्हणून म्हणुन सर्व मुद्दयाचे उत्तर नकारार्थी देण्यात येत आहे.

<u>मुद्दा क्र. ०५</u>

२०. वरील विवेचनावरुन अभियोगपक्ष आरोपींविरुध्द आरोप सिध्द करण्यास संशयरहित पुरावा आणण्यास अपयशी ठरला आहे. त्यामूळे आरोपींविरुध्द गुन्हा संशयापलीकडे सिध्द झालेला नाही. तसेच प्रकरणातील जप्त मुद्देमाल शाईन मोटार सायकल नोंदणी क्र. एम.एच.२१ बी.डब्ल्यु ४३३४ ही यापुर्वीच न्यायालयाच्या आदेशाने सुपुर्तनाम्यावर आरोपी क्र. १ गयास यांस परत केल्याचे दिसून येत आहे. तसेच प्रकरणातील जप्त मुद्देमाल प्रतिबंधीत गुटखा यांची विल्हेवाट लावली नसल्यास, नियमाप्रमाणे विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. तरी मुद्दा क्रमांक ५ करिता खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र.१ गयास मोइनोद्दीन पठाण आणि आरोपी क्र.२ अतुल लक्ष्मीनारायण चौंडीये, यांना भारतीय दंड विधान कलम ३२८, १८८, २७३ सहकलम ३४ तसेच अन्न सुरक्षा व मानके कायद्याचे कलम ५९ अन्वये आरोपांमधून फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २३५(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २. | आरोपींचे जातमुचलके व बंधपत्रे रद्द करण्यात येत आहेत. |
| ३. | प्रकरणातील जप्त मुद्देमाल गुटखा, पानमसाला यांची विल्हेवाट लावली नसल्यास, नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्यात यावी. |
| ४. | शाईन मोटार सायकल नोंदणी क्र. एम.एच.२१ बी.डब्ल्यु ४३३४ वरील गयास पठाण यांचा ताबा कायम करण्यात यावा. |
| ५. | दोन्ही आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७अ नूसार प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/- चे बंधपत्र व जामीनपत्र दाखल करावे. सदरचे बंधपत्र व जामीनपत्र हे पूढील सहा महिन्याच्या कालावधीसाठी कायम ठेवण्यात येतील. |

Digitally signed by GURLING RAMLING DHEPE
Date: 2026.08.25 17:09:08 +0530

दिनांक: २५/०८/२०२६

( जी. आर. ढेपे )
जिल्हा न्यायाधीश-८ तथा
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, जालना.

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द मुळ निकालपत्राप्रमाणे बरोबर आहे.

लघुलेखकाचे नांव – अक्षय ईश्वर देशपांडे (ग्रेड. ३)
न्यायालयाचे नांव – जिल्हा न्यायाधीश-८ तथा अति. सत्र न्यायालय

स्वा/–
लघुलेखक